# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

### दिनांक :— 07/12/2023

### चोरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— यातील फिर्यादी नामे गणेश सखाराम डेहरिया वय 45 वर्ष रा दहेगाव ता कळमेश्वर, हे सेक्युरीटी डुयटीचे काम काज पाहत असुन खडगाव येथे पुलाचे काम सुरू असुन पुलाचे कामकाजाकरीता 44 लोखंडी प्लेट आणले होते दिनांक 05/12/23 रोजी रात्री 07/00 वा फिर्यादी डयुटीवर आले असता 44 लोखंडी प्लेट मोजल्या होत्या त्यांनतर रात्री अंदाजे 03.00 वा लोखंडी प्लेटची पाहनी केली असता 17 लोखंडी प्लेट किमती 8500 रू चा माल दिसुन आला नाही. यावरून असे लक्षात आले की 17 लोखंडी प्लेट किमती 8500 रू चा माल अज्ञात चोराने चोरून नेला यावरून फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादर नामे. गणेश सखाराम डेहरिया वय 45 वर्ष रा दहेगाव ता कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोती विरूध्द अपराध क. 1016/23 कलम 379 भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ठाकरे ब.नं. 1659 मो क 9923908382 हे करीत आहे.

### प्राणांकित अपघात

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— यातील फिर्यादी नामे करण तुलाराम ओतांकी वय 23 वर्ष राहणार बॉक्स कुलर मानकापूर नागपूर यांचे वडील नामे तुलाराम ओतंकी हे दिनांक 05/12/23 चे 20.30 वा.दरम्यान आपल्या मुलाच्या घरी पायदळ जात असताना कोणीतरी अज्ञान वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या वडिलांना ठोस मारून मृत्यूस कारणीभूत ठरला अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क.725/03 कलम 304—अ, 279 भादवि. सहकलम 184 अन्वये दाखल करून सदर गुन्हयाचा पुढील तपास हा
स.फौ. पवार ब.नं. 119 मो.नं. 9881143927 हे करीत आहे.

## रात्रो घरफोडी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—यातील फिर्यादी नामे मनिश केशवराव तिडके वय 44 वर्ष रा महालक्ष्मी नगर मानेवाडा रोड नागपुर यांचे लायसनधारी दारूचे दुकान हे होरे ले आउट एमआयडीसी कळमेश्वर येथे असुन घटना दिनांक 05/12/23 चे 22.00 ते 06/12/23 चे 09.30 वा. दरम्यान अज्ञात आरोपी याने दुकानाचे समोरील कुलप तोडुन दुकानाचे आतमध्ये प्रवेश करून गल्यामध्ये ठेवलेले नगदी 19,000 रू चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क्र 1014/23 कलम 457,380 भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/ १९४६ प्रजोक तायडे मो क्र ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

## अक्समात मृत्यु

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत मौजा झमकोली २८ किमी पुर्व यातील मृतक हा त्याची आई नामे सौ सुनंदा संजय जगझापे रा झमकोली त.भिवापुर जि नागपुर हिचे घरातील सामान दुस.या घरात बदली करण्यासाठी आला असता सामान बदली करतांना इलेक्ट्रीक बोर्ड काढत असतांना मृतक याला इलेक्टीक करन्टचा झटका लागल्याने मरण पावला अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून सदर मर्ग दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे मर्ग क्रमांक 34/23 कलम 174 जा.फौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुणाल ठाकुर बन 1355 मोन 9860661164 हे करीत आहे

# रेती चोरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :– यातील नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन भिवापूर हदीत रेती चोरी ची चोरटी वाहतूक होत असल्या बाबतची गोपणीय माहिती मिळाल्याने पोलीस स्टेशन भिवापूर चे ठाणेदार स.पो.नि. मनौज चौधरी यांनी पथक तयार करून भिवापूर टि पॉइट येथे नाकांबदी लावली असता टिप्पर क्रमांक MH 29 BE 3516 व टिप्पर क्रमांक MH 40 BL 4799 यांना थांबवुन तपासले असता त्यामध्ये रेती आढळुन आले त्यावरून टिप्पर चालकाला त्याबाबत विचारले असता त्यांनी सदर रेती विना परवाना असल्याचे सांगितल्याने सदर रेती हि चोरीची आहे असे निष्पन्न झाल्याने टिप्पर क्रमांक MH 29 BE 3516 किंमत अंदाजे 30,00,000/– व त्यामध्ये रेती 8 ब्रास किंमत 40,000/– रूप्ये व टिप्पर क्रमांक MH 40 BL 4799 किंमत अदांजे 20,00,000/– रू व त्यामध्ये अं. ब्रास रेती किमंत 30,000/– रूप्ये असा एकुण 50,70,000/– रूप्यांचा मुद्देमाल जप्त करण्यात आसुन सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भिवापूर येथे अपराध क्रमांक 519/2023 कलम 379,34 भा.द.वी. सहकलम 48(8) महा.ज.म.सं. 1966 अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर ची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचं मार्गदर्शनात भिवापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मनौज चौधरी व त्यांच्या पथकाणे पार पाडली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपूर**